**म.वि.ले.से. संवर्गातील सर्व अधिकारी यांनी त्यांचे वार्षिक कार्यमूल्यमापन अहवाल MahaPAR प्रणालीमध्ये नोंदविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय लेखा व कोषागारे**
तळ मजला, कस्तुरी इमारत, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई. ४०००२०
दूरध्वनी क्र.- ०२२-२२८८०१०६ ईमेल- aaomahapardat.mu-mh@mah.gov.in

---

**वाचा :** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीएफआर १२११/प्र.क्र. २५७/१३, दि. ०७.०२.२०१८
२.सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सीएफआर-१२२४/प्र.क्र.१६४/ आस्थामं (१३), दि. २२.०१.२०२५.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सीएफआर-१२२४/प्र.क्र.१६४/ आस्थामं (१३), दि. १९.०३.२०२५.

---

क्र.संलेको ०७.२०२६/क.ले.३/गोअक/महापार/379 दि. 14/08/2026

**परिपत्रक**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या सहाय्यक लेखा अधिकारी ते संचालक या संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल संचालनालय लेखा व कोषागारे स्तरावर जतन करण्यात येतात.

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील राज्य शासकीय अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल सन २०१७-१८ या प्रतिवेदन वर्षापासून महापार या प्रणालीद्वारे ऑनलाईन लिहिण्यात यावेत अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. परंतु, अद्यापही संचालनालयास प्राप्त होणारे गोपनीय अहवाल हे बहुतांश ऑफलाईन पध्दतीने नोंदविल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या सर्व अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, वरील संदर्भ क्र. ३ च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार **"अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल हे महापार प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीनेच नोंदविलेले असणे आवश्यक आहे. ऑफलाईन पध्दतीने नोंदविलेले कार्यमूल्यमापन अहवाल आस्थापना मंडळाच्या बैठकीत विचारात घेतले जाणार नाहीत"** असे नमूद केले आहे.

D:\महापार परिपत्रके\२०२६\२०२५-२६ CR compulsury mahapar वर करणे.docx

वरील संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार जे म.वि.ले.से. अधिकारी स्वायत्त संस्था/मंडळे/महामंडळे/प्राधिकरणे या सेवांमध्ये प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत व सदर अधिकाऱ्यांचे प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकारी महापार प्रणालीमध्ये सामाविष्ट नाहीत अशाच अधिकाऱ्यांनी सदर प्रतिनियुक्ती कालावधीचे मूळ गोपनीय अहवाल ऑफलाईन पध्दतीने संचालनालयास सादर करावेत.

तरी, प्रतिनियुक्तीच्या कार्यालयामध्ये कार्यरत अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर सर्व अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल हे महापार प्रणालीमध्येच नोंदविण्यात यावेत. सदरचे परिपत्रक महाकोषवर प्रसिद्ध करण्यात येत आहे. यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

**(रश्मी नांदिवडेकर)**
**सहसंचालक (प्रशासन)**
**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रति,

१. विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व).
२. अधिदान व लेखा अधिकारी/ कोषागार अधिकारी (सर्व).
३. म.वि.ले.से. संवर्गातील सर्व अधिकारी.